B.A. S.Y. (CBCS Pattern) Semester - IV

# BA12B-2 - Marathi Literature (Optional)

P. Pages : 3 **GUG/S/23/12066**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** 'आधुनिकतेची मूल्य आधुनिक मराठी कवितेने जपली आहेत' 'आधुनिक मराठी कविता' या ग्रंथाच्या आधारे स्पष्ट करा. **16**

**किंवा**

'नवा शिपाई' या कवितेचे रसग्रहण करा.

**2.** 'गावकुसाबाहेरील दलित पीडितांच्या वेदना द्या पवारांनी आपल्या कवितेतून मुखर केल्या' या विधानाची चर्चा करा. **16**

**किंवा**

विठ्ठल वाघ यांच्या कवितांची वैशिष्ट्ये सांगा.

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील काव्यपंक्तीचे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. **16**

**गट - 'अ'**

क) आम्हांला वगळा - गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हांला वगळा - विकेल कवडी मोलावरी हें जिणें!

ख) 'एक ध्यानमंदी ठेव बेटा।
सबद लिखना बडा सोपा है
सब्दासाठी जीना मुश्कील है'

ग) मी अनुवादासारखा संचारतो सर्वत्र
कर्फ्यूसारखी भीती घेतो कर्जाऊ
असंस्कृत ठरायच्या भीती पोटी घेतो वर्तमानपत्र
अन् सोडवत बसतो आयती संस्कृती

घ) गावातल्या बायाबापड्या किती शहाण्या!
मोंकळे वारे घोंगावले
चारीही बाजूंनी
तरी थोपवून धरतात त्यांना
अनुभवी हातांनी

**किंवा**

**गट - 'आ'**

च) दणकट दंडस्नायू जैसे
लोखंडाचे वळले नाग;
कभिन्न काळ्या मांड्या जैसा
पोलादाचा चिरला साग.

छ) काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते
तिफन चालते

ज) अंगणात रांगोळी टाकताना तुला सुचलं का गोंदण?
की सिनेमातल्या जत्रा पोरागत तुझी तुझ्याशी
होणार ताटातूट हे ठरलं होतं पूर्वी?
मेल्यावर नेता येईल असं एकमेव गुप्तधन

झ) थकेली सुकडी खाल्लेल्या
भुकेल्या मुलाच्या भाषेचं काय झालं?
काय झालं टायर टायर खेळत गावभर
भटकणाऱ्या मुलांच्या भाषेचं?
काय झालं गोट्या, टबू खेळणाऱ्या
किरकोळ मुलाच्या भाषेचं?

4. पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **16**

**गट - 'क'**

त) 'जुने जाउ द्या मरणालागुनि; जाळुनि किंवा पुरूनीटाका' असे केशवसुत का म्हणतात?

थ) नारायण सुर्वे यांनी कोणाच्या नावाने 'जाहिरनामा' काढला आहे?

द) 'साहित्यिक अभिरूची' म्हणजे काय?

ध) 'नियामक सिध्दांत' उलगडून दाखवा.

**किंवा**

**गट - 'ख'**

प) मर्ढेकरांनी पृथ्वीला 'तिरडी' असे का म्हटल आहे?

फ) 'बाई' या कवितेतून व्यक्त होणाऱ्या स्त्री दु:खाचे चित्रण करा.

ब) अभिरूची भिन्नतेची कारणे स्पष्ट करा.

भ) साहित्याच्या वर्गीकरणाची तत्वे कोणती?

**5.** पुढील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **16**

1) 'कशाला झाली पुस्तकांशी ओळख'? असे दया पवारांना का वाटते?

2) 'वावर' या कवितेचा आशय उलगडून दाखवा.

3) सांस्कृतिक पर्यावरण

4) 'नाटक' या वाङ्मय प्रकाराचे विशेष सांगा.

************